# खुल्लम खुल्ला

( एकांकिका )

## --- चं. प्र. देशपांडे.

( सकाळची वेळ. मारोतराव पेपर वाचत बसले आहेत. त्यांचा तरुण मुलगा मागे एका खुर्चीवर नाराजसा बसलेला आहे. )

मारोतराव : ( आलेला फोन घेऊन फोनवर -- ) हं, बोला सेक्रेटरी – काय कुठंच काहीच नाही आज ? असं कसं ? जनसत्ताला लावा फोन – हं – का हो संपादक – काल मी भाषण नाही केलं का हुतात्मा ब्रिजच्या मैदानात ? हां ! केलं ना – म्हणजे आहे माहीत तुम्हाला – तुमचा तो, कोण तो परभणीचा चा बामण वार्ताहर – होता ना तो – मग ? काय झालं काय ? दिली होती बातमी पण मोठी जाहिरात आली म्हणून ऐन वेळी काढावी लागली ? हे कसं काय ? कितीची होती जाहिरात ? नुसत्या आमच्या वाढदिवसाच्या किती असतात तुम्हाला ? तुम्ही नाही केलं तर कुणी मग ? कंट्रोल कुणाचा असायला पाहिजे ? रेल्वे अपघात झाल्यावर राजीनामा कुणाचा मागतात ? सिग्नलमनचा ? – बरं उद्या येऊ द्या – महत्त्वाचा आहे विषय – वरून तुम्हाला नाही कळणार – आत असतोय तो डाव – ठीक, चला, असं नका करत जाऊ – ( फोन बंद करतात. पुन्हा पेपर वाचणार तेवढ्यात मुलाकडे लक्ष जाते. विचारात पडतात. मग -- ) काय झालंय युवराज, तुमची मम्मी म्हणत होती की तुम्ही नाराज दिसताय हल्ली ? मलाही दिसतंय -- एकदम खोया खोया सा वाटतोय तुमचा माहोल, काय झालंय काय ? ( युवराज गप्पच. ) बोला लौकर – वेळ नसतोय आम्हाला – तुमचं काम सांगा पटकन – सांगितलं नाही तरी कळण्याइतके जाणते राजे नाही आम्ही –

युवराज : प्रॉब्लेम होऊन बसलाय –

मारोतराव : कसला ? काळजी नका करू – तुम्ही आमचे लाडके बहुजन समाज आहात, बोला – पण थोडक्यात मुद्याचं बोला – आमच्या या गोड वंचिता चे लाड करणारच आम्ही पण अट एकच – पटकन बोलायचं –

युवराज : हिम्मतरावांची मुलगी माहीत असेल तुम्हाला –

मारोतराव : आम्हाला कशी माहीत असणार – पण, त्यांना एक मुलगी आहे, हे आहे माहीत – तर काय ?

युवराज : मला प्रेम करायचंय तिच्यावर – खरं तर करतोच आहे –

मारोतराव : ( हसून -- ) करा की मग, पण तिची संमती हवी मात्र – नाही तर आमची सगळी राजकीय करियर बरबाद होईल – तसं नको – आणि एक लक्षात ठेवा, नाही म्हणणं हा तिचा अधिकार आहे --

युवराज : तिचा आहे ग्रीन सिग्नल – पण –

मारोतराव : अरे मग अडचण काय आहे ?

युवराज : तेच, तुमचे मित्र हिम्मतराव –

मारोतराव : त्याला झालंय माहीत ?

युवराज : नाही अजून पण – भीती वाटते –

मारोतराव : अरे बाळा, माझ्या लाडक्या अल्पसंख्याका, कसली भीती वाटते तुला ?

युवराज : ते नेहमी म्हणत असतात, " आमच्या लेकीबाळी, माताभगिनी यांच्याकडं नुसतं डोळे वर करून पाहिलं कुणी तर आम्ही त्याचे डोळे काढून हातात देऊ त्याच्या " – मला अंधळं नाही व्हायचं – ती म्हणते की तसं काही होणार नाही आणि जरी झालं तरी या अंधळ्याबरोबर संसार करायला ती तयार आहे –

मारोतराव : वा ! खूपच पुढं गेलंय म्हणजे – पण, इथं काय कर्झनशाही लागलीय काय ? आणि मग तुमचे डोळे काढणाऱ्याचे हात राहतील का जागेवर ? अशा वेळी आम्ही मुळीच बघ्याची भूमिका नाही घेणार -- शिवशंकरांचे वंशज आहोत आपण –

युवराज : पण मुळात माझे डोळे काढलेच जायला नकोयत –

मारोतराव : बरं ठीक – त्याशिवायच होईल तुमचं काम – काम बोला नेमकं – हा अबकंचा वैचारिक महाराष्ट्र आहे – इथे आम्ही कुणावरही अन्याय होऊ देणार नाही – तुमच्यावर तर नाहीच नाही --

युवराज : त्यांना ते लेकीबाळी आणि माताभगिनी बोलू नका म्हणून सांगा – आमच्या कॉलेजातल्या मुली खूप घाबरतात – आपल्यामुळं कुणाचे डोळे नकोत जायला म्हणून – मुलंही मनातलं मनातच ठेवतात – मजाच गेलीय सगळी –

मारोतराव : च्यायला, वेडा आहे का काय हिम्मतराव ? डोळे वर करून बघितलं जाणार, चेष्टामस्करी होणार – हे बंद करतंय का काय ते येडं ?

युवराज : शिवरायांचे मावळे आहोत म्हणतात ते – बोलू ते करूनच दाखवू म्हणतात – आणि तुम्ही आहात विरोधी पक्षात, ते आहेत सत्तेत --

मारोतराव : ठीक – काळजी नका करू – तुम्ही आमचे लाडके प्रदेशाध्यक्ष आहात – काम होणार तुमचं – नाव काय त्यांच्या मुलीचं ?

युवराज : रेणुका --

मारोतराव : नुसतं रेणुकाच ना, रेणुकामाता नाही ना ?

युवराज : नाही –

मारोतराव : मग आम्ही घेतो पाहून – पण काम होईपर्यंत टाळा शक्य तो डोळे वर करून पाहणं –

युवराज : हं –

मारोतराव : आणि नाराज नका राहात जाऊ – हाय कमांड आहात तुम्ही आमचे, कळलं ना ?

युवराज : होय, पप्पा – पण हाय कमांड तर तुम्हालाच म्हणतात ना ?

मारोतराव : ते आहे, पण आमच्यानंतरचे तुम्हीच ना –

युवराज : वैचारिक महाराष्ट्रात ?

मारोतराव : जास्त विचार नाही करायचा – आपला फायदा आहे ना, हे बघायचं – आणि हो, एक बोलायचं होतं –

युवराज : काय पप्पा ?

मारोतराव : आमचे एक वैचारिक मित्र आहेत – मराठीचे प्रोफेसर आहेत – ते म्हणत होते की तुम्ही जरा चुकीच्या मार्गाला जाताय –

युवराज : मला नाही समजलं --

मारोतराव : तुम्ही हल्ली कुणालाही न कळणाऱ्या कविता लिहिता, असं ते म्हणत होते – ते योग्य नाही वाटत – बहुजन समाजी आहोत आपण – बहुजन समाजाच्या उत्थानासाठीच लिहा कविता – आणि कवितेचं हवंय कशाला ते खूळ ?

युवराज : त्या खुळामुळंच तर आम्ही दोघं जवळ आलोय पप्पा –

मारोतराव : पण शेवटी राजकारणच महत्त्वाचं हे लक्षात ठेवा – तुमचं हे प्रेमाचं काम झालं की ते कवितेचं द्या सोडून –

युवराज : दोन्ही एकत्र जमवेन मी पप्पा –

मारोतराव : मग ठीक – काळजी नका करू – आमच्यावर सोडा ते आता --

युवराज : थँक्यू पप्पा – चलतो मी -- ( जातो. )

मारोतराव : च्यायला, आणखी एक पोरगं काढायला पायजे होतं का काय --

( पुढच्या दृश्यात एका बाजूला युवराज आणि एका बाजूला रेणुका चॅटिंग करताहेत – हे सुरू झाल्यावर ते काल्पनिक उठून समोर येत बोलले तरी चालू शकेल – )

रेणुका : तू माझ्या डॅडींची भीती काढून टाक डोक्यातून – मी त्यांची जीव की प्राण आहे – त्यांच्या त्या प्रतिज्ञेसाठी मला दु:खी नाही करणार ते –

युवराज : मीही केलीय थोडी सोय – हा माझ्या भूखंडाचा समजा व्यवहार आणि द्या जमवून असं सांगितलंय मी माझ्या पपांना – नाही तरी अशा गोष्टी एकमेकांच्या जमवत असतातच ते –

रेणुका : म्हणजे तुझा विश्वास नाही माझ्यावर – मी एक हाती हे घडवू शकेन असं नाही वाटत तुला –

युवराज : अगं तसं नाही, पण आपापले डोळे प्यारेच असतात ना प्रत्येकाला – सगळेच घाबरत असल्यामुळं आपल्या सगळ्यांच्या लाईफमधली जानच घालवलीय तुझ्या डॅडींनी – सगळे गपचूप येतात कॉलेजात आणि ज्ञानमंदिरात आल्यासारखे पवित्र राहतात – ना चेष्टामस्करी ना हसणे ना थोडा चावटपणा – भंगार करून टाकलंय त्यांनी सगळं – असे होते शिवरायांचे मावळे ? भयानक !

रेणुका : फरगेट इट – आपण आपलं बोलू –

युवराज : हे तंत्रज्ञान आहे म्हणून नाही तर सुकून-वाळून मरगळून मेले असते सगळे तुझ्या डॅडींमुळे –

रेणुका : जाऊ दे ना ते – आपलं बोल काही तरी –

युवराज : ही एक नवी कविता ऐक –

वर्ज्यच

ठीक आहे अमुक एका काळात
मी असणार आहे पण मला
मृत्यूचे अवडंबर नको आहे
विचारांचे उपरेपण नको आहे
मतांचा वेडेपणा नको आहे
प्रेम हवे माणुसकी हवी

वगैरे हवेतल्या गप्पाही नको आहेत

मी नसेन तेव्हा
हे झाड असेल नदी असेल
समुद्र आणि आकाश असेल
हेही नको आहे -- नुसती
आहे ते सुटण्याची भीती

कोण सत्य कोण न्यायाचे
कोण सात्त्विक संतापी
कोण समर्थनीय हिंसक
हे ठरवण्याची
माझी ना कुवत ना लायकी

माझा अभ्यास तर नाहीच
शिवाय आता कसे होतील बदल
याचे मला अंदाजही नाहीत

विवेक तत्त्वज्ञान अध्यात्म
मला वर्ज्यच करायचेयत – नुसते मानसिक सगळे

रेणुका : ग्रेट ! खरंच ग्रेट !

युवराज : तुला पोचली, बास झाले, कविता – भोसड्यात गेले बाकीचे --

रेणुका : हे काय मध्येच ?

युवराज : कुणीतरी माझ्या पपांकडे तक्रार केली की मी न कळणाऱ्या कविता लिहितो म्हणून – लगेच त्यांना काळजी पडली की मग त्यांचा वारस कोण ?

रेणुका : तू त्यांचा राजकीय वारस नाही होऊ शकणार हे खरंच दिसतंय पण हे आपलं प्रेमाचं काम होईपर्यंत गप्प बस – मग राजकारणाचं देता येईल सोडून ---

युवराज : पण खरंच पोचते ना कविता ?

रेणुका : मानसिकच सगळं – आणि भ्रामक -- ते वगळलं तर आहेच काय ? ग्रेट म्हणजे ग्रेटच !

युवराज : हं, मग आता पुढं ?

रेणुका : पुढं काय ? कालच झालाय आपला सायबर सेक्स आता आज गडबडीत नको –

युवराज : सायबर सेक्सचं म्हणतच नाहीय मी –

रेणुका : मग ?

युवराज : खरंच, च्यायला आपला अनेकदा झालाय सायबर सेक्स, हे कळलं तर तुझे डॅडी आधी माझे डोळे तर काढतीलच आणि मग मला फाशी देतील !

रेणुका : तसं काही नाही होणार – आपलं बोल –

युवराज : मी तुला एक माझी इच्छा सांगितली होती – आहे का लक्षात ?

रेणुका : आहे तर ! तू मागावंस याचीच वाट बघत होते –

युवराज : म्हणजे लिहिलीयस माझ्यासाठी प्रेमकविता ? ग्रेट ! खरोखर खूप प्रेम आहे तुझं माझ्यावर –

रेणुका : अर्थात ! आहेच ! ऐक -- कवितेचं नाव आहे, ‘ पृथ्वीचे सत्य ‘ --

युवराज : ग्रेट –

रेणुका : ऐक तर आधी –

युवराज : हं – वाच –

रेणुका : -- ‘ पृथ्वीचे सत्य ‘

तुझ्या पलीकडे काही नाही
तुझ्या अलीकडे मी आहे
माझ्या मागे चंद्रसूर्यतारे
पृथ्वीचे सत्य एवढेच आहे

तुझ्यामाझ्या अवकाशात
भरून आहे प्रेम फक्त
प्रेमात आहे विश्वास आणि
तुझ्यावर माझा पहारा सक्त !

--- कशी वाटली ?

युवराज : मस्तच ! दिल खुश हुआ ! पण, विश्वास आहे तर पहारा कशाला ?

रेणुका : तोही प्रेमाचाच रे ! प्रेमाचा पहारा ! आणि तू फक्त माझाच, हे असणारच ना प्रेमात !

युवराज : हं, ते आहेच – तुझेमाझे प्रेम एकच असले तरी कविता वेगवेगळ्याच असणार आपल्या – त्या एकाच मनातून आल्यासारख्या कशा येतील ?

रेणुका : आवडली की नाही, ते खरं सांग –

युवराज : अगं, कविता ही नंतरची बाब आहे – मी तुला हक्कानं सांगणं आणि तू ते ऐकणं हीच आहे तुझ्या कवितेच्या आधीची कविता ! पण दोन्ही आवडल्या ! मस्त ! पण, तुझ्या डॅडींशीही बोलून घे तू – मी आमच्याकडे सुरुवात केलेलीच आहे – आपल्यामुळं त्यांच्यांत मारामाऱ्या न लागता जमायला हवं सगळं –

रेणुका : ( पुन्हा चॅटिंग जागेकडे जात -- ) हो रे, तसंच होईल –

युवराज : ( चॅटिंग करत -- ) आज नुसतं किसवर भागवतोय – पण उद्या सोडणार नाही, लक्षात ठेव –

रेणुका : हो रे बाबा, मान्य – चल, भेटू --

युवराज : यस – बाय –

( यापुढचे दृश्य हिम्मतराव यांचे निवासस्थान. मारोतराव येतात. )

मारोतराव : काय चाललंय ? येऊ का ?

हिम्मतराव : अरे वा, वा, या मारोतराव –

मारोतराव : आम्ही विरोधक, म्हणून आधी अपॉइंटमेंट घेऊन आलोय –

हिम्मतराव : या हो, या, सतत मनात द्वेष ठेवून वागणं ही आमची संस्कृती नाही – या –

| | |
|---|---|
| मारोतराव : | आमचीही बरी आहे तशी संस्कृती म्हणा पण प्रोटोकोल पाळणं हीही एक असतेच ना संस्कृती – |
| हिम्मतराव : | वादापेक्षा कृतीवर भर कधीही जास्त चांगला – आम्ही करून दाखवणारे आहोत – |
| मारोतराव : | आम्हीही करतच असतोय हो – न करता कुठं पोरं होतात काय ? |
| हिम्मतराव : | तुम्हाला नाही शोभत अशी पातळी सोडणं – आमची गोष्ट वेगळी आहे – |
| मारोतराव : | बरं, ते असू द्या, जेवण झालं का ? |
| हिम्मतराव : | अहो मारोतराव, जेवण ही एक क्षुद्र बाब समजतो आम्ही – आम्ही जेवण्यासाठी नाही जगत – जगण्यासाठी जेवतो -- |
| मारोतराव : | जेवल्यामुळंच आम्हीही जिवंत राहतो हे खरंच, मात्र, चिकन तंदुरी असली की बेष्ट ! |
| हिम्मतराव : | कसली तंदूर हो – आम्ही मावळे आहोत – तीन तीन दिवस उपाशी राहू शकतो – आणि तरीही शत्रूचे बारा वाजवू शकतो – ते ठीक – काय काम काढलंत ? |
| मारोतराव : | तुम्ही तलवार जरा वेळ बाजूला ठेवणार असलात तर बोलतो – नाही तर मग जे होईल ते ना तुमच्या हातात राहील ना आमच्या – |
| हिम्मतराव : | ही जरा धमकीची वाटते भाषा – आम्ही मर्द आहोत – घाबरणार नाही – |
| मारोतराव : | याच्यात कुठे प्रश्न आला मर्द असायचा ? |
| हिम्मतराव : | तुम्हाला सांगायचं होतंच पण तुम्ही यायच्या आधी काय झालं ते सांगतो – आमचा एक कार्यकर्ता आहे, त्यानं एक पुस्तक लिहिलंय, त्यात ते म्हणतंय येडं की म्हणे मर्दांनाच मुलगे होतात आणि नामर्दांना मुली – म्हटलं, च्यूत्त्या, म्हणजे तू काय आम्हाला नामर्द म्हणतोस का काय ? आणि तुझ्या आईचा बाप काय नामर्द होता ? मग म्हणाला, तसं नाही, त्या अमुक जातीत मुली जास्त असतात म्हणून तसं म्हटलं होतं – त्यांना नामर्द म्हणण्यासाठी – पण, पुढं एक बरोबर बोलला होता तो – आमच्या लेकीबाळी, बायकासुना, माताभगिनी यांच्याकडं डोळे उचलून बघायची हिम्मतच नाही करू शकणार कुणी – फुकट मरेल – मर्द आहोत आम्ही ! -- मग जा म्हटलं, लिही जा हवं ते – |
| मारोतराव : | आता तुम्ही जे बोललात ना, त्याला धरूनच बोलतो – आपण विरोधक आहे ते क्षणभर सोडा पण आपली जात तर एकच आहे – |
| हिम्मतराव : | अहो शेवटी पाहुणेच की आपण एकमेकांचे – बोला – |
| मारोतराव : | तर मी काय म्हणतो – मला एक सांगा, न रागावता सांगायचं हां – आपल्या जातीतल्या मुलींना इच्छा असतात की नाही ? |
| हिम्मतराव : | कसल्या ? |
| मारोतराव : | लग्नाच्या – लग्न करावंसं वाटणं हो – |
| हिम्मतराव : | आलं लक्षात माझ्या – संबंध करून घ्यायच्या म्हणा की – होय, असतात ना – आणि तेच आहे खरं बेक्कार -- अपमानास्पद वाटतं ! – मला मुळीच नाही आवडत ते – खरं तर असं हवं की आपण दुसऱ्या जातीतल्या मुली आणायच्या लग्न करून पण आपल्या मुलींना इच्छाच असायला नकोत – |
| मारोतराव : | पण त्यांना आनंद मिळू नये असं का वाटतं तुम्हाला ? |
| हिम्मतराव : | उलट त्याच्याशिवाय त्या आपोआप आनंदी राहाव्यात असं वाटतं मला – |
| मारोतराव : | मला एक सांगा – तुम्ही आपल्या देशाची घटना मानता की नाही ? |
| हिम्मतराव : | मानतो – |
| मारोतराव : | तसंच, वैज्ञानिक दृष्टिकोण आणि व्यक्तिस्वातंत्र्य मान्यता की नाही ? |
| हिम्मतराव : | होय, मानतो – आम्ही देशाशी गद्दारी कधीच नाही करणार – |

मारोतराव : मग तुम्ही आपल्याच मुलींना जगण्यातला आनंद का नाकारता ? त्यांचं स्वातंत्र्य का नाकारता ?

हिम्मतराव : असले वाद नका निर्माण करू – वाद न घालता प्रत्यक्ष करून दाखवणारे आहोत आम्ही –

मारोतराव : पण, हिम्मतराव, देश संभाळायचा आणि आपली मुलंच देशोधडीला लावायची असंही होऊ नये – मुलं आहेत तर देश आहे – देश म्हणजे नुसतेच सह्याद्रीचे कडे नव्हेत –

हिम्मतराव : काय, म्हणायचंय काय तुम्हाला ?

मारोतराव : जरा स्पष्टच बोलू का ?

हिम्मतराव : बोला की – भितो का काय आम्ही ?

मारोतराव : तुमची मुलगी आणि आमचा मुलगा एकाच कॉलेजात आहेत, हे माहीत असेलच तुम्हाला –

हिम्मतराव : हं, मग ?

मारोटरव : तर तुमची मुलगी आमच्या मुलाला आवडलीय – ते मागणीचंच बोलायला आलोय म्हणानात –

हिम्मतराव : वा वा वा वा वा वा – भले रे भले ! म्हणजे आता हा डाव टाकताय तुम्ही ! वा ! आम्हीही काही कच्च्या गुरूचे चेले नाहीय – भवानी मातेचे भक्त आहोत आम्ही – असल्या युक्त्यांनी फसणार नाही आम्ही – घरी जाऊन झोप काढा, जा, आराम करा – आमच्या नका नादी लागू – तसं नाही जमत तर असं वरचढ व्हायला बघताय तुम्ही --

मारोतराव : पूर्ण बोलू तर द्या – मुलांचे विचार तर घेऊ या –

हिम्मतराव : ( निक्षून -- ) बंद हा विषय – आमच्या मुलीला आम्ही सांगू काय ते – तुम्ही नका चिंता करू – दुसरं काही आहे का ?

मारोतराव : अहो, आपापल्या मातांना आनंद झाल्याशिवाय आज इथे आहोत का आपण – हा तरी विचार करा –

हिम्मतराव : दुसरं काही आहे का ?

मारोतराव : सध्या दुसरं काही नाहीय – येतो मग – पण, बघा, विचार करा –

हिम्मतराव : ठीक, या, भेटू – ( मारोतराव जातात. ) – मागणी घालतोय भोसडीचा !

( यानंतरच्या दृश्यात हिम्मतराव काही फाइली बघत बसलेले आहेत. रेणुका येते आणि बसते. मग तिचा लॅपटॉप उघडून काही बघत बसते. ताणात. दोघेही एकमेकांचा अंदाज घेताहेत. )

हिम्मतराव : ( जरा वेळाने -- ) हं – काय म्हणताहेत आमच्या रेणुकादेवी ? मम्मी म्हणत होत्या की नाराज असता म्हणे तुम्ही हल्ली ? ( काही क्षणांनी -- ) काय विचारतोय आम्ही ?

रेणुका : पहिली गोष्ट म्हणजे मला देवी म्हणणं बंद करा – माणूस आहे मी – एक साधी माणूस मुलगी –

हिम्मतराव : ओके ओके नाही म्हणणार देवी – पण काय, प्रॉब्लेम तरी काय आहे ?

रेणुका : तुम्ही माझ्याशी राजकारण नका खेळू – सगळं माहिती आहे तुम्हाला –

हिम्मतराव : अच्छा, म्हणजे त्यांच्याकडून तिकडे आणि तिकडून तुमच्याकडे असं झालेलंच दिसतेय ! आम्ही फारच गाफील राहिलोय की काय –

रेणुका : युवराजचे पप्पा हे तुमचे विरोधक आहेत हा काय माझा दोष आहे का ? अनेक हिंदी सिनेमांत घराण्यांची दुश्मनी असते – तसलं फालतू वागताय तुम्ही –

हिम्मतराव : मी अजून तुमच्या मम्मीशी बोललो नाहीय – काय म्हणते ती ?

रेणुका : तिला माझ्या भावना समजतात – ती माझ्यासारखीच माणूस आहे एक – पण तुमच्या घराण्याखाली दबलेली –

हिम्मतराव : का ? अभिमान आहे आम्हाला आमच्या घराण्याचा – शूर मावळे आहोत आम्ही –

रेणुका : ते ठीक आहे हो – पण, स्वत:च्याच मुलीशी नका ना युद्ध करू –

हिम्मतराव : आम्हाला सगळं कळलेलं आहे आणि ते आम्हाला मुळीच पसंत नाही –

रेणुका : काय दोष आहे युवराजमध्ये ?

हिम्मतराव : ते नाही माहीत आम्हाला पण त्याच्या मुलाचं नाव जर युवराज असेल तर त्याचा हा बाप फार बेक्कार आणि आपमतलबी आहे –

रेणुका : म्हणजे ?

हिम्मतराव : म्हणजे पाताळयंत्री आहे – कारस्थानी आहे – तो कसंही राजकारण फिरवू शकतो --

रेणुका : त्याचा काय संबंध ? आमचं आम्हाला जगू द्या ना –

हिम्मतराव : म्हणजे आमची मुलगी पळवून त्याला आमचं नाक कापू द्यावं ?

रेणुका : म्हणजे तुमच्या राजकारणासाठी एका चांगल्या कवीचं मन मोडणार तुम्ही ?

हिम्मतराव : अच्छा, कवी आहे म्हणजे तो –

रेणुका : मीही लिहिते कविता – तुम्हाला नसणारच ते माहीत –

हिम्मतराव : म्हणजे कवितेसारख्या क्षुद्र गोष्टीचा उपयोग करून त्याच्या मुलातर्फे पकडतोय तो आम्हाला –

रेणुका : डॅडी, कविता म्हणजे काय ते तुम्हाला माहीत नाहीय – असले फडतूस डाव टाकायचे ठरवून, कुणाला अशी ग्रेट कविता लिहिता येत नसते – राजकीय स्वार्थ नव्हे, जगण्याची आस्था लागते त्याला – सगळ्यांच्याच –

हिम्मतराव : आम्हाला वाद नाही आवडत – आणि भेटत असता का तुम्ही ? ते बंद करा – लहान आहात – लोक कसे घोळात घेतात ते तुम्हाला नाही कळणार – नंतर आपल्याला सगळ्यांनाच पस्तावायची वेळ आणतील ते – आम्ही त्यांना नामोहरम केलंय – ते डूख असणारच त्यांच्या मनात –

रेणुका : तुम्ही म्हणजे नुसतं एक घराणं आणि राजकीय स्वार्थ होऊन बसला आहात – माणूस संपलाय तुमच्यातला –

हिम्मतराव : जग कवितेवर नाही चालत बाळा – राजकारणावरच चालतं –

रेणुका : ( संतापून -- ) मला नकोय तसलं जग – ( निघून जाते. )

( आता मारोतरावांचे घर. मारोतराव रेलून बसलेत. )

मारोतराव : च्यायला, एवढा वेळ ? किती वेळ झाला सांगावा धाडून ! – ( रमाबाई येतात. )

रमा : लक्षुमीला जरा कामं सांगत होते – बोला की –

मारोतराव : पोरगं मोठं झालंय आता – येतंय ना लक्षात –

रमा : होय --

मारोतराव : तुम्हाला पदराचं कधी कळणार ?

रमा : ( मुळातच घट्ट असलेला पदर सावरत -- ) काय ते ?

मारोतराव : प्रॉब्लेमच आहे तुमच्या पदराचा –

रमा : आता ढळू नये म्हणून घट्टच घेते की मी – आता काय आणखीन ?

मारोतराव : काय कसं सांगायचं ते आम्हालाच कळे ना एवढ्या वर्षांत – अहो, घट्ट घेतलं की स्पष्ट दिसतात ना आकार – आणि तुमचे तर – कुणाचंही लक्ष जातंच –

रमा : मग आता करावं तरी काय ? सैल सोडलं तर ढळू शकतो --

मारोतराव : सैल सोडलं तर नुसतं ढळायचं नाही हो, हालचालही दिसते मग – जास्तच लक्ष जातं मग –

रमा : मग आता करावं तरी काय ?

मारोतराव : यापुढं आतून घट्ट आणि बाहेरून सैल ठेवत चला – तसा तरी फरक पडतो का बघू – च्यायला ज्याच्यावर भाळून केलं लग्न तोच आयुष्यभर प्रॉब्लेम होऊन बसलाय –

रमा : काय म्हणालात ?

मारोतराव : ( ओरडतात -- ) आतून घट्ट आणि बाहेरून सैल ! लक्षात ठेवा हे –

रमा : बरं –

मारोतराव : युवराज प्रेमात पडलेत म्हणे –

रमा : चांगली आहे मुलगी – बोलून बघा –

मारोतराव : झालंय बोलून – हिम्मतरावाला तो अपमान वाटतोय – विरोधकाकडं मुलगी देणं –

रमा : राजकारण वेगळं, हे वेगळं –

मारोतराव : तसं नसतंय ते – आता तुमच्या पिताजींनी आम्हाला आख्खा कारखाना दिला एक, तरी नम्र कुणाला राहावं लागतंय ? त्यांनाच ना –

रमा : मग राहावं की नम्र पोरीसाठी –

मारोतराव : तसं नसतंय ते – सत्तेत आहे तो –

रमा : मग बघा आता तुम्हीच –

मारोतराव : मुलगी बघितलीय ना तुम्ही ?

रमा : होय, चांगलीच आहे –

मारोतराव : आमच्या आख्ख्या खानदानात कुणी कविता नव्हती केली, च्यायला !

रमा : त्याचं काय ?

मारोतराव : तुमचा आहे ना पाठिंबा – आम्ही घेतो आता बघून –

रमा : चांगलंच होईल –

मारोतराव : आणि ते एक लक्षात ठेवायचं –

रमा : काय ते ?

मारोतराव : परत सांगू काय ? – आतून घट्ट, वरून सैल ! परत सांगायला लावू नका –

रमा : होय – जाऊ का ?

मारोतराव : आम्ही करूच प्रयत्न, पण, त्याला सांगून ठेवा – छप्पन्न मिळतील अशा – तीच पाहिजे असं नको म्हणावं – आणि दुसरं – ते कविता लिहिण्याचं शक्य तर बंद करायला लावा –

रमा : बरं –

मारोतराव : समजलंय ना सगळं ?

रमा : होय ठेवीनच की लक्षात – ( जाते. )

मारोतराव : ( स्वत:शीच -- ) म्हणजे तेच मुख्य राहिलं लक्षात – आतून घट्ट तिच्या मायला --

( आता हिम्मतरावांचे घर. ते बसलेले. त्यांची पत्नी सुभद्रा येते. )

सुभद्रा : एक बोलायचं होतं –

हिम्मतराव : तुम्हाला काय बोलायचं आहे ते आम्हाला आहे माहीत – पण, त्याच्या आधी आम्हाला दुसरंच काही बोलायचं आहे –

सुभद्रा : बोला की –

हिम्मतराव : काल विमानातून येताना एक पुस्तक वाचलं –

सुभद्रा : एक मिनिटही तुम्ही वाया नाही घालवणार – माहीत आहे मला – आमचे अण्णा म्हणायचेच – माणसानं फक्त पडायचं असतं राजकारणात – मग तो आपोआप आयुष्यभर काही ना काही काम करतच जातो – काही ना काही होतच जातो – साधा कॉर्पोरेटर झाला तरी मान आणि माल मिळतोच –

हिम्मतराव : मी जरा दुसरं बोलतोय, बोलू का ?

सुभद्रा : हो, बोला की –

हिम्मतराव : तर मी ते जे पुस्तक वाचलं त्यात असं होतं की म्हणे भारतातल्या नव्वद टक्के स्त्रिया असमाधानी असतात ! आयुष्यभर त्या असमाधानीच राहतात आणि तशाच मरतात !

सुभद्रा : गरिबी किती आहे ! दागदागिन्यांची इच्छा धरली तर पुरी कशी होणार ?

हिम्मतराव : ते नव्हे – नवऱ्याकडून असमाधानी म्हणतो तो लेखक ! रात्री – एकत्र झोपताना – भारतातल्या पुरुषांकडं कौशल्यच नसतंय म्हणतो तो --

सुभद्रा : हं हं –

हिम्मतराव : हं हं काय – तुमचा काय आहे अनुभव ? ते विचारतोय –

सुभद्रा : तसं नको – तुम्हाला काय हवंय उत्तर ते आधी सांगा – नंतर वाद नको –

हिम्मतराव : आम्ही मर्द आहोत – आमची पत्नी समाधानीच असणार !

सुभद्रा : होय तर – आहेच की ! हल्ली हल्लीच जरा कमी झालंय –

हिम्मतराव : काय ?

सुभद्रा : समाधान नाही हो – तेच – ते हे –

हिम्मतराव : आलं लक्षात – म्हणजे तुम्ही समाधानी राहात आला आहात –

सुभद्रा : होय तर ! खूपच !

हिम्मतराव : म्हणजे तेवढ्या इच्छा होत्याच तुमच्या –

सुभद्रा : हो म्हणू की नाही, ते आधी सांगा –

हिम्मतराव : खूप इच्छा असल्या आणि आम्ही नसलो वेळेला तर काय होणार ? आमची पत्नी समाधानासाठी बघतीय इकडेतिकडे, हे कसं खपेल आम्हाला ? मुंडकं उडवून टाकू ! ( डोके झाडून -- ) कन्फ्यूज व्हायला होतंय सालं --

सुभद्रा : पण समाधान खूप साठलेलंच असतं ना आधी – आणि अशी सारखी इच्छा नसते हो – शी !

हिम्मतराव : आम्ही असे तसे नाही – करून दाखवणारे आहोत –

सुभद्रा : होय की – आहे की अनुभव आम्हाला --

हिम्मतराव : तुम्हाला इच्छाच नको व्हायला पण आम्ही तुम्हाला पूर्ण समाधानी ठेवणार – असं हवंय –

सुभद्रा : चालेल की !

हिम्मतराव : प्रॉब्लेमच आहे च्यायला ! म्हणजे आपल्या पोरीलाही असणार इच्छा –

सुभद्रा : हो म्हणू की नाही – असणारच ना – समजतंच ना आपल्याला -- जगरहाटीच आहे ती –

हिम्मतराव : आणि प्रेमात पडलीय ती !

सुभद्रा : तेच तर !

हिम्मतराव : तिला इच्छाच होऊ नये अशी काही आहे का सोय ? नाही तर आमचं सगळं राजकारण बादलावं लागतंय –

सुभद्रा : हे मात्र तुम्हाला आवडो का न आवडो – खरं तेच सांगते – इच्छा घालवता नाही येणार – जाऊ का ?

हिम्मतराव : जा मग आता – बघू – ( ती जाते. स्वत:शी -- ) च्यायला आपल्याला तर पायजेच पण बाकी कुठंच नको, असं तर काही होऊ नाही शकणार --

( आता एका बाजूने युवराज आणि एका बाजूने रेणुका येतात. )

रेणुका : माझ्या मम्मीचा मला पाठिंबा आहे पण तिला आवाज कुठाय ?

युवराज : माझ्या मम्मीचा मला पाठिंबा आहे पण तिला आवाज कुठाय ?

रेणुका : आवाज दडपणारे लोक ओळखायला हवेत.

युवराज : आवाज दडपणे हे बरोबर कसे असेल ?

रेणुका : पाठिंबा आहे पण आवाज नाही – प्रॉब्लेम आहे --

युवराज : प्रॉब्लेमच आहे --

रेणुका : आता हे भेटतीलच आमच्या आयुष्यांचे शिल्पकार एकमेकांना.

युवराज : पोरांच्या प्रेमासाठी झेंडे बाजूला ठेवावे लागतात कधी कधी म्हणतील.

रेणुका : पण, त्याच्या आधी एकदा आपल्या मम्म्या भेटायला हव्यात –

युवराज : होय होय – त्याच तर आपल्या झिंदाबाद आहेत !

( आता एका ओळीत रमा आणि सुभद्रा समोर पाहात बसलेल्या आहेत. )

सुभद्रा : तुमच्याकडे कसं काय ?

रमा : छान – तुमच्याकडे ?

सुभद्रा : हे नाराज आहेत जरा पण होतील नीट –

रमा : तुमची कन्या कविता करते ना -- हे छान आहे –

सुभद्रा : तुमचे चिरंजीवही आहेतच की कवी –

रमा : हे छान होईल –

सुभद्रा : ते कसं काय ?

रमा : माणसाला एक मन असतं हे लक्षात असणार ना त्यांच्या –

सुभद्रा : ते मात्र आहे – शिवाय कौशल्य असणार --

रमा : हे आपल्याला जे बाहेर दिसतं ते असतंच हो पण सगळे मनांचेच असतात कारभार –

सुभद्रा : रेणुका सांगते ना तुमच्या चिरंजीवांची आयडिया – हे सगळं तर असलं पाहिजे पण मन नसलं पाहिजे !

रमा : मलाही फार आवडतं ते !

सुभद्रा : मन नसलं पाहिजे –

रमा : मन नसलं पाहिजे –

( रेणुका आणि युवराज एकेका बाजूला निघून जातात. मग, एकेका बाजूने मारोतराव आणि हिम्मतराव येतात. )

हिम्मतराव : वा, वा, मारोतराव, आलात, बरं झालं –

मारोतराव : आम्हीही स्वाभिमानीच आहोत हो पण कधी कधी झेंडा विसरावा लागतो.

हिम्मतराव : तुम्ही उंदीर मारणारे ससे का नाही पाळत ?

मारोतराव : तुमच्या गल्लीत काल देवदूत शिरताना दिसले.

हिम्मतराव : तुम्ही ड्रेनेजच्या भल्या मोठ्या पाईपलाईनवरून चालताय आणि मी खालून पाहतोय पिटुकला असं वाटतंय.

मारोतराव : वादळ सुटल्यावर आपण पूर्ण देशाचीच काळजी घ्यायला हवी.

हिम्मतराव : आमच्या हजारो पिढ्या गेल्या हमरीतुमरीवर येत मुंग्यांबरोबर.

मारोतराव : आमचे लोकच बिचारे आग्रह करतात हो कत्तली करायला चला म्हणून.

हिम्मतराव : खरंच वेडीबागडी आहे आमची जनता पण जिवाला जीव देणारी आहे.

मारोतराव : एकदा आम्हाला अपघात झाला होता तर इस्पितळाबाहेर दहा हजार लोक आल्ते रक्त द्यायला !

हिम्मतराव : आमच्या अंत्ययात्रेला किमान दोन लाख तरी जमतीलच.

मारोतराव : अहो, हेच तर कमवायचं आयुष्यात – आपल्या नंतर आपले पुतळे जगायला हवेत ठिकठिकाणी.

हिम्मतराव : पण आम्ही माघार घेतोय असं समजायचं नाही.

मारोतराव : आता दोन्ही पक्ष आपलेच – आता ठरवून करू राजकारण.

हिम्मतराव : आपला एकोपा होण्यात जनतेचं हितच आहे – करून दाखवू आपण.

( आता हिम्मतराव आणि मारोतराव काही अंतरावर बसलेले. युवराज आणि रेणुका येतात. खालील संवाद चालू असताना दोन्ही राव कधी स्मित करतात कधी ओशाळे होतात आणि कधी डोळे पुसतात. )

रेणुका : राजकारण म्हणजे मनांचे दगड करणे.

युवराज : राजकारण म्हणजे सतत बाबाबाबा महाराजमहाराज.

रेणुका : याची जय त्याची जय – गुलाल टिळे झेंडे तुताऱ्या.

युवराज : सगळ्यांना अनुयायी करून भूतकाळात गाडणे.

रेणुका : वर्तमानातल्या ताकदी नष्ट करणे.

युवराज : आशाळभूत होत उद्याच्या ऐवजी आजच मरणे.

रेणुका : जगाकडे, स्वत:कडे डोळेझाक करत धुंदीत जल्लोष करणे.

युवराज : राजकारण म्हणजे अंगाला चिकटलेली जातीची पाल.

रेणुका : धर्मांचे गजकर्ण, घराण्यांचे महारोग.

युवराज : द्वेषाचे डोंब आणि शत्रुत्वाचे तांडव.

रेणुका : आजच स्वत:ला मारून मुक्त होणे.

युवराज : आजच स्वत:ला मारून मुक्त होणे.

रेणुका : हे सर्व फेकून –

युवराज : हे सर्व फेकून –

दोघेही : दिलखुलास होत –

( ‘ खेल खेल में ‘ या चित्रपटातले गाणे आणि नाच -- )

खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनो
इस दुनियासे नही डरेंगे हम दोनो

प्यार हम करते हैं चोरी नही
मिल गये दिल जोरा-जोरी नही
हम वो करेंगे दिल जो कहे
हमको जमाने से क्या -- कुक्कू –
खुल्लम खुल्ला ----

( रंगीबेरंगी प्रकाश आणि नाचगाण्याची धूम – )
**--- पडदा पडत जातो -----**
**--- ००० ---**

सूचना : या एकांकिकेच्या प्रयोगासाठी वा इतर कोणत्याही सादरीकरणासाठी सदर एकांकिकेच्या लेखकाची लेखी पूर्वानुमती घेणे आवश्यक आहे.

चं. प्र. देशपांडे
फोन – ९३७१००५७७३

ईमेल – champrade@gmail.com
संकेतस्थळ – www.champralekhan.com